पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **१५**

**सभावृत्तांत**

दिनांक – **१४/०५/२०२०** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **१४/०५/२०२०** रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.फुगे भिमाबाई पोपट - सभाध्यक्ष**
२. मा.गोफणे अनुराधा देविदास
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.कदम निकिता अर्जुन
५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा सहा.आयुक्त(नावियो) , हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अश्विनी चिंचवडे

सभा कामकाज सुरु करतेवेळी सभागृहात मा.सभापती उपस्थित नसल्याने सभेचे अध्यक्षस्थान मा.फुगे भिमाबाई पोपट, सदस्या, महिला व बाल कल्याण समिती यांनी स्विकारावे.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( मा.फुगे भिमाबाई पोपट, सदस्या महिला व बाल कल्याण समिती यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले )

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) बालवाडी मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारची बौध्दिक खेळणी(कपाटसहित) देणेबाबत. – मा.निकिता कदम, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

-----------

अ) दिनांक **१३/२/२०२०,२७/०२/२०२० व १२/०३/२०२०** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभाध्यक्ष यांनी प्रकट केले.

आ) दिनांक **२७/०२/२०२० व १२/०३/२०२०** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभाध्यक्ष यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १४/०५/२०२० विभाग- नागरवस्ती विकास योजना

सुचक : - मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/७/कावि/५/२०२० दिनांक – २२/०१/२०२०

विषय – मा.महिला व बालकल्याण समिती मार्फत मा.स्थायी समिती सभेपुढे विषयपत्र निर्णयास ठेवणेबाबत..

**विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १४/०५/२०२०

सुचक : मा.अनुराधा गोफणे अनुमोदक : मा.निकिता कदम

मा.अनुराधा गोफणे, मा.निकिता कदम यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारची बौध्दिक खेळणी देणे(कपाटासहीत) तसेच याबाबतची संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही व खेळणी वाटप प्राथमिक शिक्षण विभागामार्फत करणेस तसेच खरेदीकामीची संपूर्ण प्रक्रीया मध्यवर्ती भांडार विभाग व साहित्यांची तांत्रिक तपासणी आय.टी.आय विभागामार्फत करणेत येवून याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत असणा-या मदर तेरेसा- शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगिण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( फुगे भिमाबाई पोपट )**
**सभाध्यक्ष**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/१७४/२०२०
दिनांक : १४/०५/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.